# दि कल्याण जनता सहकारी बँक लि. (मल्टीस्टेट शेडयुल्ड बँक)
## ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

गुरूवार दि. 30.09.2021 रोजी बँकेची 48 वी वार्षिक सर्वसाधारण सभा के. सी. गांधी स्कूल ऑडिटोरीअम, बैलबाजार कल्याण (पश्चिम) येथे सकाळी 10.00 वाजता आयोजित करण्यात आली होती.

सकाळी ठीक 10.00 वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी जाहीर केले की, सभेस आवश्यक ती गणसंख्या नाही, सबब सभा अर्धा तास तहकुब केली जात आहे. सदर सभा अर्ध्या तासानंतर म्हणजे ठीक 10.30 वाजता सुरू होईल व सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. त्यानंतर सकाळी ठीक 10.30 वाजता सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन सभेची सूचना वाचून दाखविली.

सभेच्या सुरूवातीस मा. अध्यक्ष श्री. सी. ए. सचिन आंबेकर यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांना नवनिर्वाचित संचालक मंडळातील संचालकांचा परिचय करून देण्याची विनंती केली.

त्यानुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांना नवनिर्वाचित संचालक मंडळातील सर्व संचालकांचा परिचय करून दिला.

सभेच्या सुरुवातीस मा. अध्यक्ष सी. ए. श्री. सचिन आंबेकर यांनी सर्व सभासदांचे स्वागत केले व दुखवटयाचा ठराव मांडण्याची विनंती बँकेचे उपाध्यक्ष मा. डॉ. रत्नाकर फाटक यांना केली.

बँकेचे उपाध्यक्ष मा. डॉ. रत्नाकर फाटक यांनी अहवाल सालात देवाज्ञा झालेले सभासद 324 असल्याचे सांगितले. उपस्थित सभासदांनी मान्यवरांची नावे वाचून दाखवावी, असे सूचित केले. त्यानुसार देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्तींच्या नावांचे वाचन केले. सभेच्या परवानगीने बँकेच्या दिवंगत सभासदांची नावे पडद्यावर दाखविण्यात आली.

त्यानंतर बँकेचे मा. अध्यक्ष सी. ए. श्री. सचिन आंबेकर यांनी यांनी अहवाल सालात देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्ति व सभासद यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सूचित केले व सर्वांना दोन मिनिटे शांतता पाळण्याची विनंती केली.

**ठराव क्र. 1 : दुखवटयाचा ठराव -**

अहवाल सालात ज्या मान्यवरांचे व सभासदांचे निधन झाले त्या दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून ही सभा श्रदांजली वाहत आहे.

माजी केंद्रीय मंत्री, व राज्यपाल - आगमोहन, खासदार - अहमद पटेल, माजी केंद्रीय गृहमंत्री - बुटासिंग, गोव्याचे माजी केंद्रीय मंत्री - कॅ. सतीश शर्मा, माजी राज्यपाल - मृदुल सिन्हा, माजी ॲटर्नी जनरल - सोली सोराबजी, हिमाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री - वीरभद्रसिंग, आसामचे माजी मुख्यमंत्री - तरूण गोगोई, मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री - मोतीलाल व्होरा, माजी आदिवासी विकास मंत्री - विष्णु सावरा, माजी मंत्री - एकनाथ गायकवाड, माजी खासदार - मोहन रावले, राष्ट्रीय लोकदलाचे अध्यक्ष - अजित सिंग, रा. स्व. संघाचे माजी अखिल भारतीय बौध्दिक प्रमुख, प्रचार प्रमुख - मा. गो. वैद्य, अखाडा परिषद अध्यक्ष - महंत नरेंद्र गिरी, ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या - कृष्णा सोबती, शास्त्रीय गायक - पद्मविभूषण उस्ताद गुलाम मुस्तफा खान, टाईम्स् समुहाच्या अध्यक्षा - पद्मभूषण इंदु जैन, चिपको आंदोलनाचे प्रणेते - सुंदरलाल बहुगुणा, कल्याण

डोंबिवली महानगरपालिकेचे माजी नगरसेवक - प्रकाश पेणकर, प्रख्यात अभिनेते - दिलीपकुमार, धावपटू - मिल्खासिंग, माजी बॅडमिंटन खेळाडू - नंदू नाटेकर, माजी क्रिकेटपटू - यशपाल शर्मा, कथ्थक, कथाकली नृत्यकार - आस्ताद देबू, विख्यात तबलावादक - शुभांकर बॅनर्जी, आयुवेदाचार्य - डॉ. बालाजी तांबे, प्रसिध्द निर्मात्या, दिग्दर्शिका - सुमित्रा भावे, नाटककार - जयंत पवार, गझलकार - मधुसूदन नानिवडेकर, गजराकार - विनायक चासकर, पार्श्वगायक - नरेंद्र चांचल, शास्त्रीय गायक - पंडीत राजन मिश्रा, संगितकार - वनराज भाटीया, अभिनेते - रवी पटवर्धन, संगीतकार - नरेंद्र भिडे, ज्येष्ठ अभिनेते - श्रीकांत मोघे, संगीतकार - रामलक्ष्मण (विजय पाटील), अभिनेते, निर्माते - राजीव कपुर, अभिनेता - सिध्दार्थ शुक्ला, अभिनेत्री - सुरेखा सिक्री, व्यवस्थापनशास्त्रातील तज्ज्ञ - डॉ. प्र. चिं. शेजवलकर, DNS बँकेने संस्थापक संचालक गणेश मंदिर संस्थानाचे पदाधिकारी, विवेकचे संपादक - श्रीपाद वामन (आबासाहेब) पटवारी, गणेश मंदिर संस्थानाचे पदाधिकारी व DNS बँकेचे माजी संचालक - अच्युतराव कऱ्हाडकर, ठाणे भारत सहकारी बँकेचे अध्यक्ष - मा. य. गोखले, सहजीवन सेवा मंडळाचे पदाधिकारी- सदानंद फणसे, राष्ट्र सेविका समितीच्या पदाधिकारी - प्रियंवदा फणसे, ख्यातनाम शिल्पकार - सदाशिव तथा भाऊराव साठे, बँकेचे माजी संचालिका - प्रतिभाताई बिवलकर, बँकेचे माजी संचालक - श्रीनिवास फणसे,

## दिवंगत सभासदांची यादी

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | 41815 | जोशी सुमती रामचंद्र | 05.01.2020 |
| 2 | 19284 | भातखंडे सदाशिव वामन | 09.01.2020 |
| 3 | 15464 | फाटक रविंद्र भास्कर | 10.01.2020 |
| 4 | 32376 | कातकडे केशवकुमार खंडू | 18.01.2020 |
| 5 | 20991 | माळूंजकर देवराम भिमजी | 21.01.2020 |
| 6 | 23959 | बेलोसे बाळकृष्ण धोंडू | 27.01.2020 |
| 7 | 45064 | कलवार संगिता रामनारायण | 27.01.2020 |
| 8 | 11272 | उपाध्याय पराना | 04.02.2020 |
| 9 | 54185 | पटेल बिल्किस अब्दूल समद | 14.02.2020 |
| 10 | 21853 | कुलकर्णी वामनमूर्ती | 15.02.2020 |
| 11 | 30971 | कुंभार वसंत परसू | 19.02.2020 |
| 12 | 61213 | आंधळे शंकर हरी | 21.02.2020 |
| 13 | 33937 | चक्रनारायण प्रकाश रामचंद्र | 22.02.2020 |
| 14 | 2578 | बोरोले जनार्दन तुकाराम | 02.03.2020 |
| 15 | 34481 | कुमावत सुमन गंगाराम | 02.03.2020 |
| 16 | 9314 | कानिटकर राजश्री श्रीधर | 15.03.2020 |
| 17 | 47166 | नामजोशी पुष्पा सदाशिव | 17.03.2020 |
| 18 | 5767 | नेवे विजयकुमार नारायण | 23.03.2020 |
| 19 | 59874 | मारूलकर चंद्रकांत राजाराम | 29.03.2020 |
| 20 | 38986 | गोरे निता नरेंद्र | 30.03.2020 |
| 21 | 30375 | बॅनर्जी तपनलाल हिरालाल | 01.04.2020 |

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | 21292 | शेख मोहम्मद रफिक | 05.04.2020 |
| 23 | 67035 | कोहर मुन्नाप्रसाद | 06.04.2020 |
| 24 | 37600 | सोनावणे दिगंबर मधुकर | 09.04.2020 |
| 25 | 26593 | जोशी मनोहर देवीदास | 18.04.2020 |
| 26 | 44971 | सहस्त्रबुद्धे अच्युत महादेव | 19.04.2020 |
| 27 | 7576 | मुजूमदार उषा विश्वनाथ | 20.04.2020 |
| 28 | 34315 | पेंडूलकर शंकर कृष्णाजी | 25.04.2020 |
| 29 | 12932 | तिवारी शेषमणी गोपिनाथ | 01.05.2020 |
| 30 | 51511 | कुलकर्णी प्रदीप मधुसूदन | 06.05.2020 |
| 31 | 29186 | गायकर अनंत धाऊ | 06.05.2020 |
| 32 | 23984 | पाटील दिनकर रावण | 25.05.2020 |
| 33 | 11801 | बागलकोटे सिकंदर बादशहा | 01.06.2020 |
| 34 | 42814 | शाईवाले सतिश यशवंत | 06.06.2020 |
| 35 | 19731 | आपटे अरविंद रामचंद्र | 09.06.2020 |
| 36 | 6461 | यादव उदयराज रामबिहारी | 11.06.2020 |
| 37 | 44793 | राठोड किशन लक्ष्मण | 11.06.2020 |
| 38 | 58529 | पाठक प्रमोद भागवत | 14.06.2020 |
| 39 | 16083 | रोठे राजेंद्र नारायण | 15.06.2020 |
| 40 | 6278 | भारंबे प्रकाश सिताराम | 18.06.2020 |
| 41 | 42538 | भोईर महेंद्र मधुकर | 19.06.2020 |
| 42 | 21550 | सत्तिगिरी विठ्ठल भिमाजी | 20.06.2020 |
| 43 | 42813 | शाईवाले सुरेखा सतिश | 23.06.2020 |
| 44 | 7535 | रहाणे भास्कर धोंडीबा | 27.06.2020 |
| 45 | 20362 | जोशी प्रविण सुधाकर | 03.07.2020 |
| 46 | 37203 | धोंडे लक्ष्मण भिमराव | 03.07.2020 |
| 47 | 3019 | नाटकर विजय सुधाकर | 03.07.2020 |
| 48 | 28455 | वाल्मिकी गीता महावीरसिंग | 05.07.2020 |
| 49 | 34542 | ढेंगळे बाळू यशवंत | 05.07.2020 |
| 50 | 69232 | रानडे किशोर परशुराम | 06.07.2020 |
| 51 | 22363 | पाटील लोटन उत्तम | 07.07.2020 |
| 52 | 22483 | पोखरकर पोपट सुखाजी | 07.07.2020 |
| 53 | 19427 | पाटील भागवत पुंडलिक | 08.07.2020 |
| 54 | 34543 | घोष तुहीन दिलीप | 10.07.2020 |
| 55 | 14606 | पांडे राममिलन सेवर | 11.07.2020 |
| 56 | 6465 | बडगुजर मधुकर पांडू | 12.07.2020 |
| 57 | 6811 | म्हात्रे लहू सुक-या | 12.07.2020 |
| 58 | 8488 | ठाकूर रामलाल धनसिंग | 13.07.2020 |
| 59 | 32614 | गुप्ते विलास यशवंत | 14.07.2020 |
| 60 | 3566 | अभ्यंकर अनिल महादेव | 14.07.2020 |
| 61 | 17670 | पाटील अशोक काशिनाथ | 15.07.2020 |

| | | | |
|---|---|---|---|
| 62 | 15137 | अष्टेकर रमेश रामचंद्र | 18.07.2020 |
| 63 | 2822 | भावे सुनिता लक्ष्मीकांत | 18.07.2020 |
| 64 | 28680 | राणे प्रदीप रूपा | 18.07.2020 |
| 65 | 28435 | चिकणे सूर्यकांत बाबूराव | 19.07.2020 |
| 66 | 31482 | सर्वगोड दाजी ज्ञानू | 20.07.2020 |
| 67 | 60924 | सावळे राम कोंडीबा | 21.07.2020 |
| 68 | 33880 | केणे आत्माराम झिपरू | 22.07.2020 |
| 69 | 57622 | चौधरी अमिर महेंद्र | 22.07.2020 |
| 70 | 6562 | आभाळे गंगाधर काशीनाथ | 24.07.2020 |
| 71 | 12342 | सोनावणे नारायण सिताराम | 25.07.2020 |
| 72 | 17219 | ठक्कर देवेन रमणभाई | 25.07.2020 |
| 73 | 32506 | पाटील मेघराज रामसिंग | 27.07.2020 |
| 74 | 45744 | जोगळेकर वसुधा निलकंठ | 30.07.2020 |
| 75 | 11411 | शेलार अंबादास दशरथ | 31.07.2020 |
| 76 | 10517 | सोनाळकर सुधीर सदाशिव | 02.08.2020 |
| 77 | 45275 | घाडी विजय महादेव | 03.08.2020 |
| 78 | 53585 | गवते संतोष ज्ञानेश्वर | 07.08.2020 |
| 79 | 39330 | पागी वसंत कृष्णा | 09.08.2020 |
| 80 | 47216 | वाचासुंदर प्रकाश आनंदराव | 11.08.2020 |
| 81 | 2780 | शर्मा किशनलाल लक्ष्मीनारायण | 11.08.2020 |
| 82 | 14799 | देशपांडे अर्पिता अरूण | 13.08.2020 |
| 83 | 202 | पळणीटकर निर्मला श्रीपाद | 15.08.2020 |
| 84 | 69733 | साठे अतुल रामचंद्र | 17.08.2020 |
| 85 | 42354 | तळपदे चिंतामण धोंडू | 20.08.2020 |
| 86 | 23011 | पाटील मच्छिंद्रनाथ रामचंद्र | 20.08.2020 |
| 87 | 50964 | आचार्य विनायक श्रीनिवास | 24.08.2020 |
| 88 | 41365 | गोरले महादू लोलू | 24.08.2020 |
| 89 | 5999 | देशपांडे विनायक वासूदेव | 27.08.2020 |
| 90 | 49288 | जमादार जमील दोस्त मोहम्मद | 29.08.2020 |
| 91 | 11556 | जोशी भिमसेन वासूदेव | 30.08.2020 |
| 92 | 34816 | ठाकरे विजयानंद विठ्ठल | 01.09.2020 |
| 93 | 32814 | देशपांडे श्रीपाद पांडूरंग | 03.09.2020 |
| 94 | 63534 | वैद्य उमेश मधुकरराव | 04.09.2020 |
| 95 | 19520 | खोले संदीप पांडूरंग | 05.09.2020 |
| 96 | 49361 | यादव अनिल आनंदराव | 05.09.2020 |
| 97 | 68060 | पिसोळकर शोभना पद्माकर | 05.09.2020 |
| 98 | 19990 | परमार जयंतीलाल नागजी | 06.09.2020 |
| 99 | 47492 | वाघ विजय रघूनाथ | 07.09.2020 |
| 100 | 63233 | विश्वकर्मा बाली गोपालसिंग | 09.09.2020 |
| 101 | 24037 | मुकणे बाळकृष्ण अमृता | 09.09.2020 |

| | | | |
|---|---|---|---|
| 102 | 14844 | जाधव विनोद यशवंत | 10.09.2020 |
| 103 | 51702 | सोनावळे विनोद वसंत | 12.09.2020 |
| 104 | 14337 | एस. सुंदरवेलू | 13.09.2020 |
| 105 | 28805 | तिसांबर शांती राजकुमार | 13.09.2020 |
| 106 | 2326 | भोईर तुकाराम बाबूराव | 13.09.2020 |
| 107 | 45347 | प्रामाणिक बिमलेंदू राधाविनोद | 15.09.2020 |
| 108 | 57154 | कुळधरण किरण तानाजी | 18.09.2020 |
| 109 | 37565 | धूमाळ विमल श्रीरंग | 19.09.2020 |
| 110 | 14617 | बाकडे अनिल भाऊराव | 20.09.2020 |
| 111 | 26751 | सरतापे कुमार महादेव | 20.09.2020 |
| 112 | 56452 | खुले पंढरीनाथ फकीरराव | 21.09.2020 |
| 113 | 46997 | पार्थसारथी जानकी | 22.09.2020 |
| 114 | 27078 | टेंबे अशोक रामचंद्र | 22.09.2020 |
| 115 | 5691 | धवन चंचल कृष्णलाल | 23.09.2020 |
| 116 | 5216 | काळे भालचंद्र गणेश | 23.09.2020 |
| 117 | 20361 | रास्ते साधना श्रीपाद | 24.09.2020 |
| 118 | 33590 | भोईर अशोक दत्तात्रय | 24.09.2020 |
| 119 | 47282 | अहुजा ब्रिजलाल रघुमल | 24.09.2020 |
| 120 | 16165 | भिमनळे देवेद्र बसण्णा | 25.09.2020 |
| 121 | 47068 | समुद्र उषा शांताराम | 25.09.2020 |
| 122 | 13463 | बंगाली दिलीप मधूकर | 26.09.2020 |
| 123 | 23648 | सूतके नामदेव नारायण | 26.09.2020 |
| 124 | 8157 | शेळके राजाराम गोपाळ | 27.09.2020 |
| 125 | 50079 | देवाडिगा कुंजीबेट्टू सूर्या | 28.09.2020 |
| 126 | 33219 | मानकामे दिलीप यशवंत | 03.10.2020 |
| 127 | 20853 | शिरभाते गजानन शंकरराव | 03.10.2020 |
| 128 | 26748 | निकम प्रकाश मारूती | 06.10.2020 |
| 129 | 5044 | सूर्यराव दामोदर हरीभाऊ | 07.10.2020 |
| 130 | 64962 | रामेकर प्रशांत गणेश | 07.10.2020 |
| 131 | 36671 | राणे संजय देवराम | 08.10.2020 |
| 132 | 45508 | ओसवाल कांतीलाल मानजी | 08.10.2020 |
| 133 | 11334 | याडकिकर विवेक पुरूषोत्तम | 08.10.2020 |
| 134 | 20159 | खैरनार गजानन नारायण | 09.10.2020 |
| 135 | 9691 | निकम महादू भिमराव | 10.10.2020 |
| 136 | 13136 | ॲन्थनी के. ओ. | 10.10.2020 |
| 137 | 6102 | कुलकर्णी अच्युत वासूदेव | 10.10.2020 |
| 138 | 2323 | आव्हाड एकनाथ दामू | 11.10.2020 |
| 139 | 4123 | वाकचौरे भिकाजी लक्ष्मण | 11.10.2020 |
| 140 | 42274 | शिंपी विश्वनाथ पुंडलिक | 12.10.2020 |
| 141 | 47004 | चौधरी रेणूका मधूकर | 13.10.2020 |

| | | | |
|---|---|---|---|
| 142 | 60650 | जोशी शरद केशव | 13.10.2020 |
| 143 | 52265 | पाटील मनोहर रामचंद्र | 15.10.2020 |
| 144 | 45339 | शिंपी स्नेहलता विश्वनाथ | 16.10.2020 |
| 145 | 13424 | चौधरी ज्ञानेश्वर वासूदेव | 16.10.2020 |
| 146 | 56897 | मालंडकर श्रध्दा वामन | 17.10.2020 |
| 147 | 17452 | मालूष्टे राजेंद्र श्रीराम | 19.10.2020 |
| 148 | 27825 | टेंभे रमेश बाळकृष्ण | 19.10.2020 |
| 149 | 24326 | भागडे तानाजी बाबाजी | 23.10.2020 |
| 150 | 20714 | कुलकर्णी दत्तात्रय सांब | 24.10.2020 |
| 151 | 22132 | गायकवाड शंकर गंगाराम | 25.10.2020 |
| 152 | 44754 | नांगरे गोरखनाथ शंकर | 25.10.2020 |
| 153 | 12702 | कातकडे कचरू बारकू | 31.10.2020 |
| 154 | 56377 | कळंबे सुमेधा सुधीर | 06.11.2020 |
| 155 | 46521 | जोशी मंगलमूर्ती पुरूषोत्तम | 07.11.2020 |
| 156 | 46764 | कोरी बिंदादीन गुरूदीन | 12.11.2020 |
| 157 | 15785 | खताळे चांगदेव विठोबा | 12.11.2020 |
| 158 | 31429 | गांधी सुरेंद्र ठाकोरलाल | 13.11.2020 |
| 159 | 15116 | पठाण रमजान गुफुर | 14.11.2020 |
| 160 | 53095 | धनगर संतोष बांगो | 16.11.2020 |
| 161 | 36607 | पाठारे राधाबाई राजू | 25.11.2020 |
| 162 | 47788 | दिघे गजानन महादेव | 26.11.2020 |
| 163 | 20660 | पाटील प्रदीप शंकर | 28.11.2020 |
| 164 | 44939 | शिंपी सुरेश गणपत | 29.11.2020 |
| 165 | 15551 | जाधव लक्ष्मण अंबाजी | 29.11.2020 |
| 166 | 59826 | पाल रामगोपाल रामावतार | 01.12.2020 |
| 167 | 21924 | काकडे शामराव बापूराव | 02.12.2020 |
| 168 | 10257 | दुराफे विनायक रामचंद्र | 02.12.2020 |
| 169 | 26277 | जोशी दिवाकर प्रल्हाद | 03.12.2020 |
| 170 | 44338 | बापट मधूकर विनायक | 05.12.2020 |
| 171 | 17779 | बाबरे काशिनाथ सदू | 07.12.2020 |
| 172 | 31859 | नजन मच्छिंद्र नामदेव | 11.12.2020 |
| 173 | 7783 | विश्वासराव प्रकाश मनोहर | 13.12.2020 |
| 174 | 23212 | झावरे वसंत सांडू | 15.12.2020 |
| 175 | 26553 | तुपे विनायक बळवंत | 19.12.2020 |
| 176 | 32718 | जोगदेव रमेश यशवंत | 20.12.2020 |
| 177 | 44945 | पिंटो जॉन ॲन्थनी | 23.12.2020 |
| 178 | 35743 | भोईर अरूण नारायण | 29.12.2020 |
| 179 | 58865 | देशपांडे मनोज दिलीप | 30.12.2020 |
| 180 | 52135 | साळूंखे हेमलता सूर्यकांत | 30.12.2020 |
| 181 | 14113 | रानडे गोविंद कृष्णाजी | 01.01.2021 |

| | | | |
|---|---|---|---|
| 182 | 42053 | जाधव वंदना कडूबा | 02.01.2021 |
| 183 | 760 | डोंगरे रघूनाथ नामदेव | 03.01.2021 |
| 184 | 30110 | घोडके भावेश संदीपन | 06.01.2021 |
| 185 | 20201 | पाटील काशीनाथ गोरख | 06.01.2021 |
| 186 | 5668 | गोष्टे अनंत काठोड | 09.01.2021 |
| 187 | 45693 | सरोदे वसंत नारायण | 15.01.2021 |
| 188 | 10595 | पांडे तारा जनार्दन | 16.01.2021 |
| 189 | 42200 | पारचे मंगल शामा | 23.01.2021 |
| 190 | 33388 | सोनावणे अर्जुन सुका | 24.01.2021 |
| 191 | 17553 | गायकवाड अनंत भागाजी | 25.01.2021 |
| 192 | 42741 | वाणी विश्वनाथ त्र्यंबक | 31.01.2021 |
| 193 | 3426 | मुंढे शालिनी यशवंत | 01.02.2021 |
| 194 | 32747 | पाटील जयवंत गोपाल | 03.02.2021 |
| 195 | 18318 | जानवलेकर रामदास गणपत | 05.02.2021 |
| 196 | 3916 | कोल्हे रघूनाथ तोताराम | 05.02.2021 |
| 197 | 69797 | मंत्री सुधाकर विठ्ठल | 07.02.2021 |
| 198 | 20164 | हिरळीकर वसंत दत्तात्रय | 07.02.2021 |
| 199 | 39676 | पाटील रघूनाथ सदाशिव | 16.02.2021 |
| 200 | 55187 | महाजन सोपान एकनाथ | 25.02.2021 |
| 201 | 35946 | भोळे सुरेश शंकर | 25.02.2021 |
| 202 | 3585 | प्रजापती रजनीकांत डाह्याभाई | 01.03.2021 |
| 203 | 19865 | काळे विनायक माधवराव | 02.03.2021 |
| 204 | 16673 | अरबट मनोहर शिवराम | 09.03.2021 |
| 205 | 46758 | जोशी विजया सुरेश | 10.03.2021 |
| 206 | 46757 | भोसले लीला निवृत्ती | 11.03.2021 |
| 207 | 23636 | भारंबे तुषार मुरलीधर | 12.03.2021 |
| 208 | 3780 | वरपे उत्तम बाबूराव | 17.03.2021 |
| 209 | 11105 | आहिरे विठ्ठल दशरथ | 20.03.2021 |
| 210 | 40810 | काळकूंबे सुमन विठ्ठल | 25.03.2021 |
| 211 | 27665 | भोईर भरत अशोक | 29.03.2021 |
| 212 | 21950 | सुतार प्रल्हाद नामदेव | 31.03.2021 |
| 213 | 43457 | पेंडसे दामोदर विनायक | 31.03.2021 |
| 214 | 42978 | रणशूर नारायण निवृत्ती | 02.04.2021 |
| 215 | 63774 | शेख समिर मुस्तफा | 03.04.2021 |
| 216 | 10987 | पाटील धर्मा बाळू | 04.04.2021 |
| 217 | 51492 | कान्हेरे दिपक विनायक | 04.04.2021 |
| 218 | 57859 | पालये अनिल हरिश्चंद्र | 05.04.2021 |
| 219 | 18781 | पावसकर प्रसाद संताजी | 06.04.2021 |
| 220 | 377 | तेली केशर भागचंद | 07.04.2021 |
| 221 | 380 | तेली सुधाकर तुळसीराम | 07.04.2021 |

| | | | |
|---|---|---|---|
| 222 | 12828 | खिस्मतराव जगदीश महादेव | 07.04.2021 |
| 223 | 13722 | कौलापूरे कृष्णा रामचंद्र | 07.04.2021 |
| 224 | 8702 | नावरकर शरद गिरी | 08.04.2021 |
| 225 | 4606 | इनामदार सतिश शांताराम | 08.04.2021 |
| 226 | 2353 | परांजपे प्रमोद गणेश | 09.04.2021 |
| 227 | 30688 | वायंगणकर अमोल विठ्ठल | 10.04.2021 |
| 228 | 35663 | जंगम विजय राजाराम | 11.04.2021 |
| 229 | 27572 | श्रीवास्तव दिनेश कुमार | 12.04.2021 |
| 230 | 13655 | अंधागळे मिलिंद वामन | 13.04.2021 |
| 231 | 36568 | जंगम अमित विजय | 13.04.2021 |
| 232 | 11306 | इंदापूरकर विनोद नारायण | 13.04.2021 |
| 233 | 46959 | सरफरे सुलेखा अरविंद | 14.04.2021 |
| 234 | 21078 | पाटील देवीदास बळीराम | 14.04.2021 |
| 235 | 28289 | गायकवाड भास्कर रामभाऊ | 14.04.2021 |
| 236 | 4406 | कुलकर्णी रमेश मुरलीधर | 14.04.2021 |
| 237 | 43373 | वाघमारे शिवराम शंकर | 16.04.2021 |
| 238 | 32715 | जोगदेव शैला रमेश | 17.04.2021 |
| 239 | 57263 | पाठक एकता अशोक | 17.04.2021 |
| 240 | 12529 | भागवत अशोक रघूनाथ | 18.04.2021 |
| 241 | 69636 | आठवले मिलिंद अरूण | 18.04.2021 |
| 242 | 35389 | गायकवाड जगन्नाथ नारायण | 18.04.2021 |
| 243 | 47367 | राजगुरू गणेश काशिनाथ | 18.04.2021 |
| 244 | 3174 | भोसले हरी मोहन | 18.04.2021 |
| 245 | 47967 | महाजन स्वप्निल अशोक | 19.04.2021 |
| 246 | 2553 | पाटील सिताराम विठू | 19.04.2021 |
| 247 | 6987 | सहस्त्रबुद्धे विष्णू गोपाळ | 19.04.2021 |
| 248 | 34827 | कारभारी सरडू पांडू | 20.04.2021 |
| 249 | 51987 | जाधव आशालता वसंत | 20.04.2021 |
| 250 | 55694 | साळवी दत्ताराम दादू | 21.04.2021 |
| 251 | 8767 | सावंत यशवंत लक्ष्मण | 23.04.2021 |
| 252 | 2796 | सरदेशपांडे रामचंद्र नारायण | 24.04.2021 |
| 253 | 69321 | यादव दूर्गावती मुन्नू | 24.04.2021 |
| 254 | 51469 | कदम महेंद्र नारायण | 25.04.2021 |
| 255 | 24027 | योहन्नान तकंच्चन | 25.04.2021 |
| 256 | 486 | शृंगारपूरे रमेश नारायण | 26.04.2021 |
| 257 | 19525 | राजर्षी दत्तात्रय कृष्णाजी | 26.04.2021 |
| 258 | 11666 | बडगुजर दिगंबर सोनू | 26.04.2021 |
| 259 | 16000 | खराटे मिलिंद सखाराम | 26.04.2021 |
| 260 | 37349 | प्रजापती अल्पेश रतीलाल | 26.04.2021 |
| 261 | 10477 | चव्हाण प्रकाश विठोबा | 27.04.2021 |

| | | | |
|---|---|---|---|
| 262 | 44455 | जाधव हंबीरराव सिताराम | 27.04.2021 |
| 263 | 45337 | चौधरी यशवंत गिरधर | 28.04.2021 |
| 264 | 7775 | बाठे रमेश धूलाजी | 29.04.2021 |
| 265 | 9163 | मते मंगारू तुळशीराम | 29.04.2021 |
| 266 | 45694 | मोगरे भाग्यश्री पुरूषोत्तम | 29.04.2021 |
| 267 | 39283 | बाठे सुमन सूर्यकांत | 01.05.2021 |
| 268 | 17493 | वेर्णेकर चेतन चंद्रसेन | 01.05.2021 |
| 269 | 19979 | द्विवेदी राधेशाम शारदाप्रसाद | 02.05.2021 |
| 270 | 2945 | गावडे नंदकिशोर रंगनाथ | 02.05.2021 |
| 271 | 34864 | कदम दत्ताराम यशवंत | 03.05.2021 |
| 272 | 40317 | गांगल पद्मावती | 04.05.2021 |
| 273 | 39815 | देशमुख मोहन महादेव | 04.05.2021 |
| 274 | 65928 | कांबळे संजय उत्तम | 05.05.2021 |
| 275 | 32099 | साळवे भिमराव सूदामराव | 05.05.2021 |
| 276 | 21841 | देवळे सूचिता सदाशिव | 05.05.2021 |
| 277 | 7476 | कोल्हे कारभारी लक्ष्मण | 06.05.2021 |
| 278 | 11347 | चौधरी सुधाकर दामोदर | 06.05.2021 |
| 279 | 49755 | चव्हाण इंदू पांडूरंग | 06.05.2021 |
| 280 | 27208 | माळवे अरुण शंकर | 06.05.2021 |
| 281 | 39773 | बुचके वासंती वसंत | 06.05.2021 |
| 282 | 50528 | वड्ड बाळासाहेब शामराव | 09.05.2021 |
| 283 | 69371 | धारप वामन प्रभाकर | 07.05.2021 |
| 284 | 119 | काळे सुशिला विष्णू | 08.05.2021 |
| 285 | 35121 | जोशी अलका रामचंद्र | 09.05.2021 |
| 286 | 69008 | पाटील दगडू रामदास | 09.05.2021 |
| 287 | 36344 | रायकवार कालीचरण हरीकिसन | 10.05.2021 |
| 288 | 42356 | नलावडे विजया भिकाजी | 10.05.2021 |
| 289 | 43007 | गंधे सुरेखा गुरूनाथ | 11.05.2021 |
| 290 | 5065 | गोसावी गौतम विठ्ठल | 11.05.2021 |
| 291 | 26609 | बनसोडे संजय गणानाथ | 12.05.2021 |
| 292 | 47363 | गोंधळी प्रशांत सुरेश | 12.05.2021 |
| 293 | 56978 | शेलार एकनाथ विठ्ठल | 13.05.2021 |
| 294 | 71847 | पवार मंगेश किसन | 14.05.2021 |
| 295 | 21637 | पडवळ मधुकर मालू | 14.05.2021 |
| 296 | 70219 | पवार प्रदीप बाबासाहेब | 14.05.2021 |
| 297 | 40768 | शर्मा सुरेशकुमार ब्रजमोहन | 15.05.2021 |
| 298 | 45749 | परदेशी गोपालसिंग केशरसिंग | 17.05.2021 |

| | | | |
|---|---|---|---|
| 299 | 44348 | दलाल रामचंद्र द्वारकानाथ | 17.05.2021 |
| 300 | 48555 | किरकिरे नलिनी श्रीकृष्ण | 19.05.2021 |
| 301 | 32048 | कोर जगन्नाथ यशवंत | 21.05.2021 |
| 302 | 24977 | मोरे उमाकांत शंकर | 25.05.2021 |
| 303 | 26740 | भिडे प्रभावती त्रिंबक | 26.05.2021 |
| 304 | 22763 | वर्मा सरोज सुभाष | 29.05.2021 |
| 305 | 26229 | डोळस रघूनाथ हरी | 29.05.2021 |
| 306 | 29233 | निचीत सूर्यकांत बाबूराव | 29.05.2021 |
| 307 | 29285 | पाटील श्रीकृष्ण भरत | 02.06.2021 |
| 308 | 20530 | डोईफोडे गुणेश जगन्नाथ | 03.06.2021 |
| 309 | 48910 | बोरसे संदिप नानाभाऊ | 03.06.2021 |
| 310 | 23787 | पिपंळे विजय पुरूषोत्तम | 04.06.2021 |
| 311 | 14076 | कलारीया हसमुख गोरधन | 08.06.2021 |
| 312 | 6635 | सातपूते धर्मा शंकर | 18.06.2021 |
| 313 | 18840 | कुलकर्णी श्रीराम पुरूषोत्तम | 19.06.2021 |
| 314 | 38814 | घोडके लीला वसंत | 22.06.2021 |
| 315 | 8031 | आंधळे सुमन निवृत्ती | 25.06.2021 |
| 316 | 47619 | खटावकर शिला मुरलीधर | 27.06.2021 |
| 317 | 16762 | तोडकर रामचंद्र सखाराम | 02.07.2021 |
| 318 | 8494 | भोसले शकुंतला पांडूरंग | 06.07.2021 |
| 319 | 13244 | सोनी माधव अमृतलाल | 10.07.2021 |
| 320 | 34614 | पुराणिक विनया नविन | 12.07.2021 |
| 321 | 55257 | जयवंत सुमन द्वारकानाथ | 19.07.2021 |
| 322 | 29831 | आंबेकर कृष्णा भागोजी | 05.08.2021 |
| 323 | 20473 | व्यवहारे माधव शंकरराव | 05.08.2021 |
| 324 | 35273 | आघारकर पद्मा श्रीराम | 06.08.2021 |

प्रत्यक्ष उपस्थित व ऑनलाईन पद्धतीने प्रक्षेपण बघणाऱ्या सर्व सभासदांचे मा. अध्यक्ष सी. ए. श्री. सचिन आंबेकर यांनी पुन्हा एकदा स्वागत केले.

सभासद श्री. अरुण शिंपी यांनी मागिल वर्षाच्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तात श्रध्दांजलीच्या ठरावात नीला सत्यनारायण यांच्या हुद्दयात बदल असल्याचे सांगितले. यावर मा. अध्यक्षांनी त्यांची नोंद घेत असल्याचे सांगितले.

दि. 3 मार्च, 2021मध्ये बँकेचे नविन संचालक मंडळ कार्यरत झाले. मागील संचालक मंडळातील 8 निवृत्त संचालकांचे बँकेच्या संपलेल्या आर्थिक वर्षातील वाटचालीत मोठे योगदान असल्याचे मा. अध्यक्षांनी नमूद केले. तसेच या पुढे देखील त्यांचे मार्गदर्शन मिळेल व त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा निश्चितच फायदा होईल असे नमूद केले.

Central Register ने जारी केलेल्या दि. 25.08.2021 रोजीच्या परिपत्रकानुसार तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 च्या निर्बंधानुसार आजची सभा घेत असल्याचे नमूद केले.

आपली आर्थिक संस्था असल्यामुळे आपल्याला ठेवीदार, खातेदार किंवा कर्जदार यांच्या खात्यांबाबतच्या माहितीची गोपनियता ठेवणे बंधनकारक आहे. त्यामुळे कुठल्याही खात्याबाबत वैयक्तिक माहिती अथवा प्रश्न विचारू नयेत असे सभासदांना सूचित केले.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा सभेसमोर सादर केला.

**विषय : संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. 31.03.2021 रोजी संपलेल्या आर्थिक वर्ष अहवालाची नोंद घेणे तसेच सन 2021-22 च्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे.**

**दृकश्राव्य माध्यमातून सन 2020-21 चा आर्थिक अहवाल सभेपुढे मांडताना मा. अध्यक्ष्यांनी बोर्ड ऑफ मॅनेजमेंट विषयी माहिती दिली.**

रिझर्व्ह बँकेने बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे गठन करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आपल्या बँकेने बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे गठन केले आहे. त्याचे सदस्य रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व निकषांची पूर्तता करीत असून बोर्ड ऑफ मॅनेजमेंट कार्यरत झाले असल्याचे सांगितले. बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1.ॲड. सुरेश वामन पटवर्धन | B. Com, LLB. |
| 2. श्री. पद्मनाभ जयंत जोशी | B.E.(Electrical) |
| 3. श्री. हेमंत सुदाम दरगोडे | B. Com, CA (Inter) |
| 4. श्री. विवेक पुरूषोत्तम घळसासी | B. Com, CAIIB. |
| 5. प्रा. बिपिनचंद्र रमेश वाडेकर | M. Com, MBA Accounts, B.Ed. |
| 6. ॲड. अश्विन मिलिंद जोगळेकर | B.com, LLB. |
| 7. श्री. अतुल नारायण खिरवडकर | M.Com, CAIIB-I |

वर नमूद बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या सदस्यांच्या विविध क्षेत्रातील अनुभवांचा बँकेस फायदा होईल असे मा. अध्यक्षांनी सांगितले.

सभेचे कामकाज हे विषय पत्रिकेत नमूद असलेल्या विषयांप्रमाणेच चालणार असल्याचे नमूद केले.

गेल्या वर्षभरात बँकिंग क्षेत्रात अमुलाग्र बदल झाले. हे बदल मूलतः नियमनाबाबत आहेत. बँकिंग नियामक कायदा, 1949 मध्ये, गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात दुरूस्त्या मंजूर झाल्या आणि त्यामुळे सहकारी बँकांचे नियमन हे सार्वजनिक / खाजगी बँकांप्रमाणेच होणार आहे. थोडक्यात बँकिंग नियामक कायद्यातील कलम 56 अन्वये नागरी सहकारी बँकांना काही बाबतीत सवलत होती, ती आता काढून घेतली आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँकेला नागरी सहकारी बँकांचे नियंत्रण करण्याविषयी जास्त अधिकार प्राप्त झाले आहेत. उदा. वैधानिक लेखा परीक्षकांची नेमणूक करण्यासाठी, तसेच उपविधीमध्ये दुरूस्ती करण्यासाठी रिझर्व्ह बँकेची पूर्वपरवानगी घेणे, आवश्यक ठरले आहे. मुख्य कार्यकारी आधिका-यांची नेमणूक करण्यासाठी देखिल रिझर्व्ह बँकेची परवानगी घ्यावी लागणार आहे. सभासदांना कळविण्यास मला आनंद होत आहे की आपल्या बँकेने या सर्व बाबींची वेळोवेळी पूर्तता केली आहे.

बँकिंग नियामक कायद्यातील सुधारणांमुळे, रिझर्व्ह बँक नागरी सहकारी बँकांच्या व्यवस्थापनावर परिणामकारक नियंत्रण ठेऊ शकेल. बँकिंग नियामक कायद्यातील कलम 10 अन्वये, बँकेच्या संचालक मंडळावर

51% संचालक, हे त्यामध्ये नमूद केलेल्या व्यावसायिक पात्रतेचे निकष पूर्ण करणारे असायला हवेत. या आधी नमूद केल्याप्रमाणे, नवनिर्वाचित संचालक मंडळ त्याची पूर्तता करीत आहे.

मार्च 2021 मध्ये सुप्रीम कोर्टाने सर्व बँकांना रुपये दोन कोटी व त्याहून अधिक कर्ज मर्यादा असलेल्या खात्यांच्या बाबतीमध्ये या महामारीच्या दरम्यान म्हणजे ''मोरॅटोरियम'' काळातील ''व्याजावर व्याज'' लागले होते त्याचा परतावा करण्याचे आदेश दिले. अर्थातच हा परतावा सर्व बँकांना आपल्या नफा तोटा खाती वर्ग करुन द्यावयाचा असल्याने नफा क्षमतेवर परिणाम झाला आहे.

यंदाच्या वर्षी केंद्र सरकारने काही नवीन कायदे पास केले आहेत. ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्याकरता केंद्राने डिपॉझिट इन्शुरन्स ॲन्ड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन (DICGC) या कायद्यामध्ये अमुलाग्र बदल केले आहेत. त्या बदलांचा मुख्य भाग थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

१ डीआयसीजीसी कायद्याच्या कलम 15 मधील बदलानुसार ठेवी विम्याच्या हप्त्याच्या रकमेमध्ये वाढ करण्याची मुभा डीआयसीजीसीला दिली आहे. परंतु सदर वाढ करण्यासाठी रिझर्व्ह बँकेची पूर्वपरवानगी लागेल.

२ डीआयसीजीसी ॲक्ट मध्ये एक नवीन कलम वाढवण्यात आले आहे. त्यानुसार एखाद्या बँकेस रिझर्व्ह बँकेने मोरॅटोरियम लावला किंवा आदेश दिला किंवा कुठलेही विशिष्ट दिशानिर्देश दिले तर ठेवीदारांना बराच काळ गेल्यानंतर देखील त्यांच्या ठेवींचे पैसे मिळत नसत. परंतु ह्या नवीन तरतुदीनुसार ठराविक मर्यादेत पैसे परत करण्याकरता तरतूद करण्यात आलेली आहे.

३ सदर कायद्याच्या कलम 21 मध्ये जो बदल झालेला आहे त्या बदलामुळे कॉर्पोरेशनला त्यांनी दिलेले पैसे नंतर एखाद्या अवसायनात गेलेल्या किंवा मोरॅटोरियम मध्ये असलेल्या बँकेकडून ग्राहकांना द्यायला किंवा त्यांचे पैसे परत मिळायला जर का दिरंगाई केली तर या विषयांमध्ये परतावा मिळण्याकरता दंडव्याज अथवा त्याच्या नियमांमध्ये बदल करण्याचे अधिकार डीआयसीजीसीला प्राप्त झालेला आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँक यांनी खूप चांगली आणि नागरी सहकारी बँकांच्या हिताची पावले उचलली असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले.

कोरोनाचे संकट संपूर्ण वर्ष राहिले. सहाजिकच याचा परिणाम बँकेच्या व्यवसायावर झाला. लेखापरीक्षण पश्चात आपणापुढे सादर केलेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकातून ही बाब स्पष्ट दिसून येईल. अहवाल वर्षामध्ये एकत्रित व्यवसाय ₹ 5179.08 कोटी झाला आहे. गतवर्षाच्या तुलनेत एकत्रित व्यवसायात 1.82% इतकी नाममात्र वाढ झाली आहे. मंदावलेल्या आर्थिक परिस्थितीत झालेली वाढ ही एक निश्चितच समाधानकारक बाब आहे. बँकेचे भागधारक, ठेवीदार, कर्जदार, संचालक मंडळ, सर्व कर्मचारी, ग्राहक व हितचिंतक या सर्वांच्या पाठिंब्यांच्या बळावर बँकेने प्रतिकुल परिस्थितीत ही कामगिरी केलेली आहे.

अहवाल वर्षात भागभांडवल ₹108.24 कोटी इतके झाले आहे. कोरोनाच्या जागतिक संकटामुळे मंदावलेली आर्थिक परिस्थिती, व्यवसायात झालेली घट, अकस्मात घरगुती अडचणी, इ. कारणांमुळे काही सभासदांनी त्यांचे भागभांडवल परत घेतले. पर्यायाने भागभांडवल 3.26% नी कमी झाले आहे. राखीव व इतर निधींमध्ये ₹9.88 कोटींची वाढ झाली आहे. सन 2021-22 हे वर्ष देखिल आव्हानात्मक असणार आहे. भविष्यकाळासाठी आपण तरतूद करीत आहोत. नफा विभागणीमध्ये आपल्या निदर्शनास येईल कि बुडित व संशयित कर्ज निधीमध्ये आपण ₹13.00 कोटींची तरतूद केली आहे यासाठी सर्वसाधारण मुक्त निधी ₹11.07 कोटी तिथे वर्ग केले आहेत.

सभासद संख्येमध्ये 1291 सभासदांची वाढ होऊन सभासद संख्या 58149इतकी झाली. या नियमित सभासदांव्यतिरिक्त नाममात्र सभासदांची संख्या 7380 इतकी झाली. यापैकी 1363 नाममात्र सभासद असून इतर सभासदांच्या कर्जांकरिता 6017 नाममात्र सभासद जामिनदार आहेत.

भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार किमान 9% असणे आवश्यक आहे. मार्च -2021 अखेर आपल्या बँकेचे हे प्रमाण 12.32 % आहे. बँकेच्या सक्षमतेचे, सुदृढतेचे व आर्थिक स्थैर्याचे हे द्योतक आहे. वर्ष अखेर स्वनिधी **₹** 204.89 कोटी आहे.

गतवर्षी, बँकिंग क्षेत्रामध्ये खूपच आव्हाने होती. जागतिक कोरोना संकटामुळे ठेवी व कर्जव्यवहार यांच्या वाढीची गती मंदावलेली होती. एकंदरीत देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी ही परिस्थिती अडचणीची ठरली. या पार्श्वभूमीवर आपल्या बँकेने गतवर्षीपेक्षा ठेवींमध्ये 1.88% नाममात्र वाढ केलेली आहे. अहवाल वर्षामध्ये बँकेच्या ठेवी गतवर्षीच्या **₹** 3129.08 कोटी वरुन **₹** 58.68 कोटीने वाढून **₹** 3187.76 कोटीपर्यंत पोहोचल्या. सातत्याने वाढणाऱ्या ठेवी हे ग्राहकांचे बँकेवरील अढळ विश्वासाचे द्योतक आहे.

ग्राहकांच्या ठेवींच्या सुरक्षेकरिता प्रति ग्राहक **₹** 5 लाखापर्यंतच्या ठेवींना विम्याचे संरक्षण मिळणार आहे. त्यानुसार प्रत्येक ग्राहकाची **₹** 5 लाखांपर्यंतची ठेव सुरक्षित राहील. 1 ऑक्टोबर 2020 ते मार्च 2021 ह्या कालावधीकरिता **₹** 223.63 लाख (**₹** 3149.11 कोटींचे ठेवींवर) व 1 एप्रिल 2021 ते 30 सप्टेंबर 2021 या कालावधीकरिता **₹**225.83 लाख (**₹** 3187.76कोटींचे ठेवींवर) विमा हप्ता डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (DICGC) यांचेकडे भरलेला आहे.

व्यावसायिक दृष्ट्या मागिल संपूर्ण वर्ष अत्यंत अस्थिर होते. वर्षाच्या अखेरीस व्यवसायांनी आणि अर्थव्यवस्थेने उभारी घ्यायला सुरूवात केली. परंतु फेब्रुवारी-मार्च, 2021 मध्ये कोविड-19 च्या दुस-या लाटेचा तडाखा संपूर्ण देशास बसला. उत्पन्नावर परिणाम झाल्याने थकीत कर्जे मोठया प्रमाणावर वाढली. काही कर्ज प्रकरणांमध्ये कर्जदाराचे निधन होणे, गंभीर आजार, नोकरी जाणे, व्यवसाय बंद होणे, इ. कारणांमुळे वसुली होणे शक्य नसते. अशी खाती निर्लेखित केली जातात. या वर्षी एकूण 349 कर्जखाती **₹** 1929.78 लाख मुद्दल रकमेची निर्लेखित केली आहेत आणि नफा-तोटा खाती न घेतलेल्या व्याजाची रक्कम **₹** 1132.08 लाख आहे, ती उलटवली आहे. ताळेबंद स्वच्छ करणे हा हेतू आहे. महत्त्वाचे म्हणजे निर्लेखनामुळे आयकराची बचत होते. असे असून देखिल, आपल्या बँकेने उत्तम कामगिरी केली आहे आणि बँकेने **₹** 19.42 कोटी नफा मिळवला आहे. मागिल वर्षापेक्षा तो थोडा जास्त आहे.

प्रति कर्मचारी उत्पादकता अहवाल वर्षात **₹** 10.22 कोटी झाली आहे. व्यावसायिक पात्रता आणि सुयोग्य प्रशिक्षणाद्वारे कर्मचाऱ्यांची उत्पादकता वाढविण्याचा बँकेचा उद्देश आहे.

मागील वार्षिक सर्वसाधारण सभेने मे. वैशंपायन अँड पाध्ये यांची वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक करण्याचा ठराव पारित केला. बँकिंग नियामक कायदा, 1949 मध्ये झालेल्या बदलांनुसार, त्यांच्या नेमणूकीचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे पाठविला. रिझर्व्ह बँकेने त्यांच्या नेमणूकीस मंजुरी दिल्यानंतर मे. वैशंपायन अँड पाध्ये यांची नेमणूक केली गेली. त्यांनी लेखापरीक्षण करुन सादर केलेला लेखापरीक्षण अहवाल आपल्या समोर सादर केलेला आहे. आपणास सांगण्यास मला आनंद होत आहे की, लेखापरीक्षकांनी 2020-21 या आर्थिक वर्षाकरिताही बँकेला ‘अ’ दर्जा दिलेला आहे.

कर्जावरील व्याजाव्यतिरिक्त इतर उत्पन्नाचे साधन म्हणून बँकेने विमा वितरण व्यवसायामध्ये पदार्पण केले. जीवन विमा व्यवसाय मे. कोटक महिंद्र लाईफ इन्शुरन्स कंपनीबरोबर सन 2011 पासून आणि इतर सर्वसाधारण विम्याकरिता दि न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनीबरोबर सन 2014 पासून आपली बँक कार्यरत आहे. विम्याच्या या दोन्ही क्षेत्रामध्ये बँकेने सातत्याने व्यवसाय वृध्दी नोंदविलेली आहे. जीवन विम्यापोटी 690 विमा पॉलिसींतून ₹ 230.77 लाख रकमेचे विमा हप्ते आणि इतर सर्वसाधारण विम्यापोटी 1145 पॉलिसींतून ₹ 58.23 लाख इतकी विमा प्रिमियम रक्कम बँकेने अहवाल वर्षात जमा केली आहे. या दोन्ही प्रकारच्या विमा व्यवसायातून बँकेने ₹73.36 लाख इतकी रक्कम कमिशनपोटी मिळविली आहे.

कॉर्पोरेट एजन्सी अंतर्गत विमा वितरण व्यवसायाबरोबर बँकेने भारत सरकारच्या सामान्य नागरिकांकरिता दोन्ही विशेष विमा योजनांमध्ये सहभागी होऊन यशस्वीरित्या या योजना राबविल्या. या योजना भारत सरकारने ऑगस्ट 2015 मध्ये "प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना" आणि " प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना" या नावाने सुरु केल्या. पहिल्या योजनेमध्ये ₹ 330/- वार्षिक अशा अत्यल्प विमा हप्त्यामध्ये ₹ 2 लाख इतकी जीवन विमा सुरक्षा आणि दुसऱ्या योजनेमध्ये ₹ 12/- वार्षिक अशा नाममात्र विमा हप्त्यामध्ये ₹ 2 लाख इतके सर्वसामान्य विमा कवच उपलब्ध आहे. यातील जीवनविमा योजनेचा लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियामार्फत 4358 खातेदारांनी लाभ घेतला. त्यापोटी ₹13.04 लाख विमा हप्ता रक्कम भरली आहे. तसेच सामान्य विम्याच्या योजनेचा न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनीमार्फत 9582 खातेदारांनी लाभ घेतला त्यापोटी ₹ 1.14 लाख विमा हप्ता रक्कम भरण्यात आली.

दस्तऐवजांवर मुद्रांक शुल्क भरण्याची सुविधा बँकेने आपले ग्राहक तसेच इतरांनाही आपल्या काळातलाव कल्याण शाखेमध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. 2020-21 या अहवाल वर्षामध्ये 22104 दस्तऐवज मुद्रांकनाद्वारे बँकेला ₹4,68,190/- इतक्या रकमेचे उत्पन्न मिळाले. विमा व्यवसायाप्रमाणेच हा व्यवसाय बँकेच्या व्याज व शुल्क उत्पन्नाव्यतिरिक्त उत्पन्नाचे साधन आहे. ₹ 5000 पर्यंतचे दस्ताऐवज मुद्रांकित केले जातात.

पुरस्कार : यानंतर अहवाल वर्षात बँकेला जे विविध पुरस्कार मिळाले त्याबद्दलची माहिती मा. अध्यक्षांनी सभेस दिली.

I. **FCBA** यांच्या कडून मोठ्या सहकारी बँकांच्या गटात **Best Investment Initiative** आणि **Best Fraud Contol Initiative** पुरस्कार प्राप्त.
II. **BANCO-** बँको मासिकातर्फे सन 2019-20 करिता मोठ्या सहकारी बँकांच्या विभागात ‘Best Bank’ पुरस्कार प्राप्त.

सभासद कल्याण निधीअंतर्गत प्रतिवर्षी सभासदांच्या पाल्यांना ‘विद्यार्थी प्राविण्य पुरस्कार’ देण्यात येतो. बँकेच्या सभासदांच्या पाल्यांनी इयत्ता 10 वी, 12 वी अथवा तत्सम परीक्षांमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल बँक दरवर्षी अशा पाल्यांचा यथोचित गौरव करीत असते. आपण याचबरोबर "भारताचार्य वैद्य पुरस्कार" आणि "डॉ. आनंदीबाई जोशी पुरस्कार" असे दोन पुरस्कारही देत असतो. कोरोनाच्या निर्बंधामुळे समारंभ न करता विद्यार्थ्यांना प्राविण्य पुरस्कार देण्यात आले.

बँकिंग व्यवसायाबरोबरच बँक सामाजिक बांधिलकीही जपत असते. दरवर्षीच्या नफ्यातून 1% रक्कम "धर्मादाय निधी" या फंडामध्ये जमा केली जाते. या फंडातून दरवर्षी विविध सामाजिक, शैक्षणिक, तसेच वैद्यकीय

क्षेत्रातील काम करणाऱ्या संस्थांना मदत करण्यात येते. यावर्षीचा धर्मादाय निधी वितरण कोरोनाच्या निर्बंधामुळे समारंभ न करता करण्यात आले. शैक्षणिक, वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या 112 संस्थांना निधी वितरण करण्यात आले.

सभासदर कल्याण निधीतून रु. 1000 मृत्यूपश्चात सभासदांच्या वारसदारास दिले जातात.

बँकेचे ज्येष्ठ संचालक मा. श्री. वामनराव साठे यांनी सूचित केले आहे की, कोरोनाने निर्वतलेल्या सभासदांच्या वारसदारास अतिरिक्त मदत द्यावी. त्यावर संचालक मंडळाने विचार करून अतिरिक्त रु. 2500/- देण्याचा विचार आहे असे अध्यक्षांनी नमूद केले. त्याबाबत RBI अथवा तत्सम नियामकांची परवानगी आवश्यक असल्यास त्यांची परवानगी घेऊन त्याची पुढे कार्यवाही केली जाईल.

पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकाबाबत विवेचन करतांना मा. अध्यक्षांनी सांगितले की, अस्थिर वातावरणाचा परिस्थितीवर होणारा परिणाम लक्षात घेता जरी व्यवसायाची वाढ सरासरी होणार असली तरी नफाक्षमता तेवढीच राखण्याचे ठरवले आहे. ठेवी रु. 3300 कोटी आणि कर्ज रु. 2100 कोटी होतील. ढोबळ अनुत्पादित कर्ज 5% च्या आसपास राहतील. मूलतः आपले प्रयत्न अनुत्पादित कर्ज कमीत कमी करण्याकडे आणि नफा वाढवण्याकडे राहतील. नियामकांचे असलेले सर्व निकष आपण पूर्ण करू. यानंतर सभेत ठराव सादर करण्यात आला.

**ठराव क्र. 2 :** संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. 31.03.2021 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल **मा. अध्यक्ष सी. ए. सचिन आंबेकर** यांनी सभेपुढे वाचून दाखविला. त्याचबरोबर पुढील वर्षाचे अंदाजपत्रक व नवीन व्यावसायिक उद्दिष्टे सभेपुढे मांडली. त्याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | नाव : श्री. राजेंद्र नारायण कुडे | सभासद क्र. : 18460 |
| अनुमोदक : | नाव : श्री. फणसे सुनिल धुंडीराज | सभासद क्र.: 8439 |

ठराव सर्वानुमत्ते मंजूर.

या नंतरचा विषय वैधानिक लेखापरिक्षणासंदर्भात असून तो मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. हेमंत दरगोडे यांना सांगितले.

**विषय: वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासलेला दि. 31.03.2021 रोजीचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल स्वीकृत करणे. तसेच मागील वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.**

विषयास सुरुवात करताना श्री. हेमंत दरगोडे यांनी सांगितले की ताळेबंद व नफातोटा याबाबतची आकडेवारी मा. अध्यक्षांनी त्यांच्या भाषणांतून सभेपुढे मांडली आहे. नफा तोटा खात्यात जे बदल झाले त्याबाबतची माहिती सभेस सादर केली.

कर्जावरील व गुंतवणूकीवरील व्याज हे बँकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्तोत्र आहे. तर ठेवींवरील व्याज हा बँकेचा मुख्य खर्च आहे. कर्जावरील व्याजात ₹13.57 कोटीनी घट झालेली दिसते. गुंतवणुकीवरील व्याज ₹ 1.03 कोटींनी वाढलेले दिसत आहे. या वर्षी कर्ज रोखे व्यवहारातून बँकेने मागील वर्षाच्या तुलनेत ₹ 8.53 कोटी नफा जास्त मिळविला आहे.

ठेवीवरील व्याजात ₹11.61 कोटींनी घट झालेली दिसत आहे. देय कर्जावरील व्याज रक्कम ₹ 1.11 ने वाढलेले दिसत आहे. वेतन व इतर भत्तांमध्ये फारसा बदल नसून कोटी ₹ 0.6 ने वाढ झालेली आहे. कार्यालय भाडे कर व वीज खर्चामध्ये घट दिसत आहे. स्थावर मालमत्तेवरील घसाऱ्यामध्ये घट दिसत आहे. दुरूस्ती व इतर किरकोळ खर्चामध्ये थोडयाफार प्रमाणात घट झाली आहे.

त्यानंतर श्री. दरगोडे यांनी वैधानिक परीक्षणाच्या दोषदुरूस्ती अहवालाची नोंद घेताना सांगितले की वैधानिक लेखापरिक्षक सभेस उपस्थित आहेत. मे. वैशांपयन अँड पाध्ये यांनी 2019-20 चा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल दि. 03.09.2020 रोजी सादर केला आहे. लेखापरिक्षण अहवालात नमुद केलेल्या बाबींचा दोषदुरुस्ती अहवाल बहुराज्यीय कायद्यानुसार वैधानिक लेखापरीक्षकांना दि. 29.11.2020 रोजी सादर करण्यात आला. सदर दोषदुरुस्ती अहवाल केंद्रीय निबंधक, नवी दिल्ली यांचेकडे दि. 10.12.2020 रोजी सादर करण्यात आला.

मा. श्री दरगोडे पुढे म्हणाले की, लेखापरीक्षण अहवालातील काही मुद्दे उदा. RC Book नसणे, Stock Statement नसणे, C. A. Certificate for Statutory Dues Clearance, तारण मालमत्तेचा, वाहनांचा विमा नसणे, अशा काही बाबींची पूर्तता होण्यास ठराविक कालावधी लागत असल्याने असे मुद्दे ऑडिटमध्ये येतात व बँक त्यांचा पाठपुरावा करुन पूर्तता करुन घेते. त्यानंतर मा. श्री. दरगोडे यांनी मा. अध्यक्षांना याबाबतचा ठराव मांडण्यास सांगितले.

**ठराव क्र. 3 :** वैधानिक लेखापरीक्षक मे. वैशंपायन अँड पाध्ये यांनी दि. 31.03.2021 रोजीचा तपासलेला ताळेबंद, नफातोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल **मा. संचालक हेमंत दरगोडे** यांनी सभेपुढे मांडला व समजावून सांगितला त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे. तसेच मागील वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाचा दोषदुरुस्ती अहवाल **मा. संचालक हेमंत दरगोडे** यांनी सभेपुढे सादर केला. त्याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | सौ. वैशाली श्रीरंग गोखले | सभासद क्र. 17786 |
| अनुमोदक : | श्री. सुधीर अनंत कळंबे | सभासद क्र. 8491 |

ठराव सर्वानुमते मंजूर.

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक ॲड. सुरेश पटवर्धन यांना सांगितले.

**विषय: संचालक मंडळाने सुचवलेल्या सन 2020-21 सालच्या नफा वाटणीस मंजूरी देणे.**

विविध प्रकारच्या निधींसाठी नफ्याची विभागणी कशा स्वरूपात केली आहे याचे विस्तृत विवेचन मा. ॲड. पटवर्धन यांनी केले. आर्थिक वर्ष 2019-20 साठी लाभांश देण्यास रिझर्व्ह बँकेने प्रतिबंध केला होता. त्यामुळे मागिल वर्षी लाभांश दिला गेला नाही. आर्थिक वर्ष 2020-21 साठी रिझर्व्ह बँकेने बँकांना लाभांश देण्याची मुभा काही अटींची पूर्तता करित असल्यास, दिली आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेली परिस्थिती, त्याचा व्यवसायावर झालेला परिणाम, करावी लागणारी तरतूद, या सर्व बाबींचा विचार करून संचालक मंडळाने वर्ष 2020-21 साठी 7% लाभांश देण्याची शिफारस केली आहे. सदर नफावाटणीस सभेने मंजुरी द्यावी, अशी विनंती केली. त्यानंतर मा. अध्यक्षांनी नफा वाटणीचा ठराव वाचून दाखवला.

**ठराव क्र. 4** : सन 2020-21 या वर्षात निव्वळ नफा ₹ 19,42,13,776/- इतका झाला आहे. संचालक मंडळाने नफा वाटणीस पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे. ती **मा. संचालक ॲड. सुरेश पटवर्धन** यांनी सभेसमोर मांडली. सदर नफा वाटणीस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच धर्मादाय निधीचे वितरण करण्याबाबतचे अधिकार संचालक मंडळास देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

(₹)

| | |
|---|---|
| निव्वळ नफा | 19,42,13,776.00 |
| सर्वसाधारण मुक्त निधीतून वर्ग | 11,07,00,000.00 |
| मागील शिल्लक | 57,731.00 |
| **एकूण** | **30,49,71,507.00** |
| **वाटणी** | |
| राखीव निधी (25%) | 4,86,00,000.00 |
| सर्वसाधारण मुक्त निधी (10%) | 1,95,00,000.00 |
| राष्ट्रीय सहकार शिक्षण निधी (1%) | 19,00,000.00 |
| गुंतवणूक वध घट निधी | 1,00,00,000.00 |
| लाभांश (2019-20) | 0.00 |
| धर्मादाय निधी (1%) | 19,00,000.00 |
| सभासद कल्याण निधी | 5,00,000.00 |
| महोत्सव निधी | 30,00,000.00 |
| कर्मचारी सानुग्रह निधी | 1,25,00,000.00 |
| निवडणूक निधी | 10,00,000.00 |
| शैक्षणिक निधी | 1,00,000.00 |
| बुडीत व संशयित कर्ज निधी | 13,00,00,000.00 |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | 7,59,71,507.00 |
| **एकूण ₹** | **30,49,71,507.00** |

सभासद श्री. अरुण शिंपी यांनी नफा ₹ 19.42 कोटी असून बुडीत व संशयित कर्ज निधी ची तरतूद ₹ 13 कोटीची दिसते, त्याबाबत निवेदन करावे असे सांगितले. त्यावर मा. अध्यक्षांनी त्याचे स्पष्टीकरण दिले की राखीव व इतर निधींमध्ये ₹ 9.88 कोटींची वाढ झाली आहे. सन 2021-22 हे वर्ष देखिल आव्हानात्मक असणार आहे. भाविष्यकाळासाठी आपण तरतूद करीत आहोत.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. विवेक वसंत डयाहाडराय | सभासद क्र. 25839 |
| अनुमोदक : | श्री. वसंत गांगुर्डे | सभासद क्र. 43652 |
| | ठराव सर्वानुमत्ते मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालिका ॲड. संपदा कुळकर्णी यांना सांगितले.

**विषय : सन 2021-22 साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.**

सन 2020-21 साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा विषय **मा. संचालिका ॲड. संपदा कुळकर्णी** यांनी सभेपुढे मांडला. मे. वैशंपायन ॲंड पाध्ये यांची नेमणूक करण्याची शिफारस संचालक मंडळाने केली आहे. मल्टीस्टेट को-ऑप सोसायटीज् ॲक्ट, बँकिंग नियामक कायदा यानुसार वैधानिक लेखा परिक्षकांची नेमणूक करावी लागते. बँकिंग नियामक

कायद्यानुसार, वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करण्यास रिझर्व्ह बँकेची पूर्वपरवानगी घ्यावी लागते. त्यानुसार मे. वैशंपायन अँड पाध्ये यांच्या नेमणूकीचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे सादर करण्यात आला. त्यांच्या नेमणूकीस रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली आहे. मे. वैशंपायन अँड पाध्ये यांच्याबाबत ICAI, व बँकेचे NFRA यांचे प्रतिकूल अभिप्राय नाहीत. सदर फर्मने बँके चे लेखापरीक्षण करण्यास संमती दर्शविली आहे. त्यामुळे सभेने ठरावास मंजुरी द्यावी, अशी विनंती केली.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी या विषयासंदर्भातील ठराव सभेपुढे मांडला. ठराव मंजुरीपुर्वी श्री. अरूण शिंपी यांनी मल्टीस्टेट को. ऑप. ॲक्टनुसार वैधानिक लेखापरीक्षक सभेस उपस्थित आहेत का ? असा प्रश्न विचारला ? त्यावर उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की मा. संचालक श्री. हेमंत दरगोडे यांनी त्यांचा विषय मांडतांना वैधानिक लेखापरीक्षक मे. वैशंपायन अँड पाध्ये यांचे भागीदार श्री. वैशंपायन सभेस उपस्थित असल्याचे सांगितले होते. मा. अध्यक्षांनी वैधानिक लेखापरिक्षक श्री. वैशंपायन उपस्थित आहेत, हे पुन्हा नमूद केले.

**ठराव क्र. 5**: मल्टीस्टेट सहकारी कायदा 2002 च्या कलम 70 आणि सध्या लागू असलेल्या इतर तरतुदींनुसार सन 2021-22 साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता, या वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपासून पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मे.वैशंपायन अँड पाध्ये यांची पुनर्नेमणूक करण्यात यावी अशी शिफारस संचालक मंडळाने केली आहे. **मा. संचालिका ॲड. सौ. संपदा कुळकर्णी** यांनी सभेसमोर प्रस्ताव मांडला. मे. वैशंपायन अँड पाध्ये यांनी त्यांच्या पुनर्नेमणूकीस मान्यता कळविली आहे. बँकिंग नियामक कायदा, 1949 मधिल दुरुस्तीनुसार, भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. 30.07.2021रोजीच्या पत्र क्रमांक CO.DOS.RPD.NO. S570/08.02.007/2021-2022 अन्वये त्यांच्या नेमणूकीस ना हरकत दिली आहे. त्यानुसार मे.वैशंपायन अँड पाध्ये यांची सन 2021-22 करिता वैधानिक लेखापरीक्षक म्हणून पुनर्नेमणूक करण्यात येत आहे. तसेच नियमानुसार त्यांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. रविंद्र विनायक साळुंखे | सभासद क्र. 16682 |
| अनुमोदक : | श्री. रविंद्र दत्तात्रय ताम्हनकर | सभासद क्र. 15475 |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. पद्मनाभ जोशी यांना सांगितले.

**विषय : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.**

बँक आपल्या संचालकांना अथवा त्यांचा नातेवाईकांना कोणत्याही प्रकारचे कर्ज देत नाही. परंतु रिझर्व्ह बँकेच्या नियमांप्रमाणे संचालकांना स्वतःच्या नावावरील मुदत ठेवी, जीवन विमा पॉलिसी, सरकारी कर्ज रोखे यांच्या तारणावर कर्ज घेता येते. बँकेच्या संचालकांनी अथवा नातेवाईकांनी कोणत्याही प्रकारचे कर्ज घेतलेले नाही असे मा. संचालक श्री. पद्मनाभ जोशी यांनी सांगितले

**ठराव क्र. 6 :** संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबतचा ठराव **मा. संचालक श्री. पद्मनाभ जोशी** यांनी सभेपुढे मांडला.

संचालक व त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही प्रकारचे कर्ज घेतले नाही त्यामुळे त्यांची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. महेंद्र खंडू शिंदे | सभासद क्र. 17750 |
| अनुमोदक : | श्री. शौनक विजयकुमार फणसळकर | सभासद क्र. 69109 |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. मिलिंद नाईक यांना सांगितले.

**विषय : संचालकांचे नातेवाईक असलेल्या बँकेच्या कर्मचाऱ्यांची नोंद घेणे.**

संचालकांचे नातेवाईक असलेल्या बँकेच्या कर्मचाऱ्यांची नावे **मा. संचालक श्री. मिलिंद नाईक** यांनी सभेपुढे वाचून दाखविली. संचालकांचे नातेवाईक असलेल्या कोणत्याही कर्मचा-यास अहवाल सालात बँकेमध्ये कंत्राटी अथवा स्थायी स्वरूपात नेमणूक केलेली नाही. परंतु बँकेच्या नवनिर्वाचित संचालिका ॲड. संपदा कुळकर्णी यांचे मेव्हणे श्री. श्रीरंग गणेश गोखले (सहव्यवस्थापक) हे दि. 20.08.1987 पासून बँकेत कायमस्वरूपी नोकरीत कार्यरत आहेत याची माहिती श्री. नाईक यांनी दिली.

यानंतर सभासद श्री. अरुण शिंपी यांनी बँकेत नोकरी लागण्यासाठी काही संचालक पैसे घेत असल्याचा आरोप केला. त्याबाबतचे पुरावे त्यांच्याकडे आहेत, असे सांगितले. यावर मा. अध्यक्षांनी श्री. शिंपी यांना सांगितले की त्यांच्याकडे जे पुरावे आहेत, ते त्यांनी सादर करावेत म्हणजे संबंधितांवर योग्य ती कारवाई करता येईल. त्यानंतर ठराव सादर करण्यात आला.

**ठराव क्र. 7 :** संचालकांचे नातेवाईक असलेल्या बँकेच्या कर्मचाऱ्यांची नावे **मा. संचालक श्री. मिलिंद नाईक** यांनी सभेपुढे वाचून दाखविली. संचालकांचे नातेवाईक असलेल्या कोणत्याही कर्मचा-यास अहवाल सालात बँकेमध्ये कंत्राटी अथवा स्थायी स्वरूपात नेमणूक केलेली नाही. परंतु बँकेच्या नवनिर्वाचित संचालिका ॲड. संपदा कुळकर्णी यांचे मेव्हणे श्री. श्रीरंग गणेश गोखले (सहव्यवस्थापक) हे दि. 20.08.1987 पासून बँकेत कायमस्वरूपी नोकरीत कार्यरत आहेत याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. आत्माराम बळवंत घाणेकर | सभासद क्र. 14497 |
| अनुमोदक : | श्री. अनंत अप्पाजी देशमुख | सभासद क्र. 29386 |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. मधुसूदन पाटील यांना सांगितले.

**विषय:** **या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**
या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याबाबत सर्व उपस्थित सभासदांना सूचित केले

**ठराव क्र. 8 :** या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याचा ठराव **मा. संचालक श्री. मधुसूदन पाटील** यांनी सभेपुढे मांडला. अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती ही सभा क्षमापित करीत आहे.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी, या विषयासंदर्भातील ठराव सभेपुढे मांडला.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. अजित बळीराम कारभारी | सभासद क्र. 44952 |
| अनुमोदक : | श्री. अच्युत विष्णू सहस्त्रबुध्दे | सभासद क्र. 11599 |
| | ठराव सर्वानुमत्ते मंजूर. | |

माजी संचालक मा. श्री. अशोक प्रधान सरांनी कोरोनाच्या काळात कर्मचाऱ्यांनी उत्तम कामगिरी केली त्यांचे आभार मानले जावे व त्यांना कोरोना योध्दा म्हणून जाहीर करावे अशी सूचना केली. त्याचप्रमाणे सभासद श्री. निळकंठ काळे यांनी बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी कोरोना काळात उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल तसेच वसुलीचे काम ही योग्य रितीने केले, त्याबद्दल त्यांचे कौतुक केले व त्यांचे आभार मानले.

सन 2015-21 या कालावधीत माजी अध्यक्ष मा.ॲड. सुरेश पटवर्धन आणि माजी उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेस प्रगतीपदावर ठेवण्याचे कार्य केले. त्यामध्ये यंदाच्या निवडणूकीत निर्वृत्त झालेल्या संचालकांचा मोठा हातभार आहे. त्यामुळे त्या सर्वांचे अभिनंदन करणारा ठराव माजी संचालक मा. श्री. अशोक प्रधान सरांनी सदर केला. त्यास माजी संचालक मा. श्री. लक्ष्मीकांत उपाध्याय यांनी अनुमोदन दिले.

मा. अध्यक्षांनी उपाध्यक्ष मा. डॉ. रत्नाकर फाटक यांना आभार प्रदर्शन करण्याची विनंती केली परंतु त्यापूर्वी श्री. शिंपी यांनी बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या जागेबाबत प्रश्न विचारला. श्री. शिंपी यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेपुर्वी दोन पत्रे दिली होती त्याची बँकेने उत्तरे दिली आहेत. मा. अध्यक्षांनी त्यावर सभेत जाहीरपणे सांगितले की बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या जागेचा मुळ दावा हा न्यायप्रविष्ट असल्याने त्याबाबत भाष्य करणे योग्य ठरणार नाही. त्यावर काहीही भाष्य होणार नाही.

डॉ. रत्नाकर फाटक यांनी सर्वप्रथम त्यांनी बँकेच्या सभासदांचे आभार मानले. सभेच्या आयोजनाबाबत सेंट्रल रजिस्ट्रार व महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्वांबाबत त्यांचे आभार.

ही सभा तांत्रिक दृष्ट्या यशस्वी होण्यासाठी बँकेने तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य तज्ञ संस्था मे. टॅनम कन्सल्टींग एल एल पी ह्यांची नेमणूक केली होती. सर्व तंत्रज्ञानासाठी मे. टॅनम कन्सल्टींग ह्यांचे आभार.
कोरोना महामारी मुळे उद्भलेल्या परिस्थितीमुळे मर्यादा येऊन सुध्दा प्रत्यक्ष उपस्थित व ऑनलाईन उपस्थित राहिलेले सर्व सभासद, बँकेचे आजी माजी संचालक खातेदार ठेवीदार यांचे आभार.

सद्य परिस्थितीत प्रत्यक्ष उपस्थित न राहू शकल्यावरही बँकेला सहकार्य करणाऱ्या सभासदांचे आभार सभेसाठी हा हॉल उपलब्ध करून देणारे Kalyan Education Trust व त्यांचे विश्वस्त, K. C. Gandhi High School व त्यांचे शिक्षक व सर्व कर्मचारी यांचे आभार.

बँकेचे वार्षिक अहवाल सुबक छपाई करून देणारे मे. वैभव एंटरप्रायजेस यांचे आभार. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना छपाई करणारे मे. दादाजी धाकजी इन्फोटेक प्रा. लि. यांचे आभार आणि पोस्ट खात्याने त्याचे वितरण वेळेत केले, त्यांचेही आभार.

करोना काळात बँकेस सहकार्य करणारे सभासद, खातेदार ठेवीदार व या कसोटीच्या काळात स्वतःचा जीव धोक्यात घालून ग्राहक सेवा देणारा बँकेच्या सर्व कर्मचारी बंधू व भगिनी यांचे मनःपूर्वक आभार.

सभेतील सर्व ठरावांना सूचक व अनुमोदक रहाणारे सभासद व ठरावांना पाठिंबा देणारे सर्व सभासद यांचे आभार

सभेची सर्व पूर्वतयारी, प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे बोर्ड डिपार्टमेंटचे अधिकारी, बँकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे आभार. सहकार्यासाठी पोलिस, पत्रकार यांचे आभार.

बँकेचे सर्व सभासद ठेवीदार, खातेदार, कर्जादार यांनी बँकेवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल बँक कृतज्ञ आहे.

अनवधानाने ज्यांचा उल्लेख राहिला आहे, त्या ज्ञात, अज्ञात व्यक्तिंना, उपस्थित सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद !

त्यानंतर मा. अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहिर केले.